# अमेरिकेतील मराठी नाटयप्रयोगांचा जनक : डॉ. शंकर हुपरीकर

धनंजय जोशी

मराठी माणूस जगात कुठेही पोहोचला तरी त्याचं नाटयप्रेम सुटत नाही. अमेरिकेत १९७१ पासून दरवर्षी मराठी माणसांना गोळा करुन नाटक बसवणारे खरे नाटयप्रेमी म्हणजे डॉ. शंकरराव हुपरीकर!

शंकररावांच्या शरीरामध्ये रक्त वहात नाही! नाटक वाहतं! लिओ बस्काग्लिया हा इटालियन विचारवंत म्हणतो, "माणूस जन्माला येतो तेव्हा त्याला जीवन नावाची सुंदर भेट सुंदर वेष्टनात बांधून मिळते". लिओला शंकरराव भेटले असते तर त्यानं जीवन आणि नाटक असंही कदाचित लिहिले असतं!

शंकरराव मूळचे कर्नाटकमधल्या रामदुर्ग गावाचे. तिथे शाळेत आणि सांगलीला कॉलेजमध्ये असताना त्यांना मराठी नाटकाची आवड निर्माण झाली. तेव्हा प्रत्यक्ष नाटकात काम करण्याचा योग आला नाही. पुढे मुंबईला एल्फिस्टन कॉलेजच्या आणि इन्स्टिटयूट ऑफ सायन्सच्या महाराष्ट्र वाङःमय मंडळात तो योग जुळून आला. नटवर्य रामचंद्र वर्दे 'तुझे आहे तुझपाशी' बसवत होते. त्यात शंकररावांनी आचार्याची प्रमुख भूमिका सादर केली. रामचंद्र वर्दे हे शंकररावांचे गुरु! व्यावसायिक आणि हौशी रंगभूमीवर वर्दे यांनी दोन शिष्य तयार केले. डॉ. काशिनाथ घाणेकर आणि डॉ. शंकरराव हुपरीकर!

१९६६ साली बायोकेमिस्ट्रीमध्ये संशोधन करण्यासाठी शंकरराव शिकागोला गेले. त्यांच्या सामानाबरोबर नाटयवेड पण शिकागोला पोहोचलं असं म्हणायला हरकत नाही. अमेरिकेतले पहिले; संपूर्ण, दीर्घ लांबीचे नाटक 'प्रेमा तुझा रंग कसा' शंकररावांनी शिकागोमध्ये सादर केले! नाटयसेवेची पंचवीस वर्षे (१९७१–१९९६) पूर्ण झाली तेव्हा शिकागोच्या महाराष्ट्र मंडळात आपल्या रचनांचा खास श्री. शंकरराव हुपरीकर गौरव विशेषांक प्रसिध्द केला होता. पंचवीस वर्षानंतर देखील शंकरराव थांबले नाहीत. २००२ पर्यंत ते नाटक दरवर्षी नेमानं सादर करत राहिले.

| नाटयसेवेची पंचवीस वर्षे | |
|---|---|
| **१९७१ प्रेमा तुझा रंग कसा**<br>नील राव, अंजली गुप्ते, मोहन भावे, चंद्रशेखर जोशी, सुधाकर करमरकर, हेमा शेडे, शंकर हुपरीकर, पार्श्ववाचक—अनिल वीरकर, शीला प्रचंड | **१९७५ पपा सांगा कुणाचे**<br>अलका गाडगीळ, अशोक शेंडे, अनीता जोगळेकर, सुहास कुरणे, शंकर हुपरीकर, सुहास आठल्ये, जयश्री हुपरीकर, हेमा शेंडे |
| **१९७२ बायकात पुरुष लांबोडा (एकांकीका)**<br>अमोल वीरकर, शंकर हुपरीकर, जयश्री वीरकर, कुसुम करमरकर, मोहिनी जोशी, पद्मा आंबेकर, अंजली गुप्ते, अनीता गोडबोले, जयश्री हुपरीकर, शेखर जोशी | **१९७६ कथा कुणाची व्यथा कुणा**<br>सुभाष नाडकर्णी, रवी पंडीत, पुष्पा प्रचंड, गोपाळ प्रचंड, मधूसूदन भावे, सुप्रिया भावे, शंकर हुपरीकर, अशोक शेंडे, सुहास कुरणे |
| **१९७२ बदाम राणी चौकट गुलाम (एकांकिका)**<br>सुधाकर करमरकर, सुहास आठल्ये, अनिला वीरकर, शंकर हुपरीकर, जयश्री हुपरीकर | **१९७७ तुझे आहे तुजपाशी**<br>नारायण प्रचंड, अशोक शेंडे, आनंद गर्दे, अनुपमा धारकर, मीनल ताम्हाणे, सुधाकर मोराणकर, गोपाळ प्रचंड, सुहास कुरणे, शंकर हुपरीकर, अनीता गोडबोले, वीणा लोंढे, मंगल सुदामे, वंदना गर्दे |
| **१९७४ कटयार काळजात घुसली (छोटा भाग)**<br>सुनीती काणे, हेमा शेंडे, चंद्रशेखर जोशी, शंकर हुपरीकर | **१९७८ मोहिनी**<br>प्रमोद चेंबुरकर, अरुण लोंढे, अशोक शेंडे, आनंद गर्दे, वीणा लोंढे, वंदना गर्दे, अनुपमा धारकर, सुहास कुरणे, शरद गोडबोले, शंकर हुपरीकर, संजय हुपरीकर, धनंजय केळकर, सुधाकर मोराणकर |
| **१९७८ काचेचा चंद्र**<br>अनुपमा धारकर, अशोक शेंडे, अरुण लोंढे, आनंद गर्दे, वंदना गर्दे, वीणा लोंढे, शरद गोडबोले, धनंजय केळकर, शंकर हुपरीकर, सुधाकर मोराणकर, प्रमोद चेंबुरकर | **१९७९ सूर्याची पिल्ले**<br>शंकर परांजपे, धनंजय केळकर, प्रमोद चेंबुरकर, अशोक शेंडे, अनुपमा धारकर, सुभाष परांजपे, मोहिनी जोशी, शंकर हुपरीकर, शेखर जोशी |